# फौजदारी किरकोळ अर्ज नं.२९४/२०२३ – निशाणी १२ लगत आदेश

संप्रता प्रविण झेंडे वि. प्रविण राजेंद्र झेंडे

CNR No. MHSO20-001198-2023

प्रस्तुतचा अर्ज जाबदार क्र.१ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'एकतर्फा चौकशी' चा आदेश रद्द होऊन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. जाबदार क्र.१ च्या कथनाप्रमाणे, जाबदार हे मजूरीचे कामानिमीत्त इस्लामपूर येथे राहत होते व आहेत. जाबदार यांना सदर कामाबाबत कोणतीही माहिती वेळेत न मिळाल्यामुळे कोर्टात हजर राहून अर्जदार यांचे अर्जास म्हणणे देणे अशक्य झाले. त्यामुळे जाबदार विरुध्द 'एकतर्फा चौकशी' आदेश झालेला आहे. जाबदार यांचे म्हणणे रेकॉर्डवर घेणे गरजेचे असून जाबदार विरुध्द झालेला 'एकतर्फा चौकशी' हुकूम रद्द करण्यात येवुन जाबदार यांची कैफियत स्वीकारणेची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जास अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे मांडले की, अर्जात नमूद कारणाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा जोडलेला नाही. अर्ज खरा व बरोबर नाही. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. यदाकदाचित अर्ज मंजूर करणेचे झालेस हेवी कॉस्ट करणेची विनंती केली. जाबदारांनी अर्जदार हिस म्हणणेची प्रत देणेकामी हुकूम व्हावा.

३. दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद ऐकला. अर्जाचे अवलोकन केले असता जाबदार क्र.१ यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु त्यांनी दाव्याचे कामी

हजर राहून त्यांची कैफियत दिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द 'एकतर्फा चौकशी' आदेश झालेला आहे. सदर जाबदारचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्याने मुळ अर्जाचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. अर्ज मंजूर केल्याने अर्जदारचे नुकसान होणार नाही. परंतु विलंबाचे कारण लक्षात घेता खर्च जाबदार क्र.१ वर ठेवणे योग्य होणार आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

आ दे श

१. अर्ज (नि.क्र.१२) जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांना रक्कम रु.५००/– (पाचशे रूपये) मंजूर करणेत येतो.

२. जाबदार क्र.१ यांचे विरुध्द झालेला 'एकतर्फा चौकशी' चा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

दिनांक – १७/०१/२०२४

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19/01/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 19/01/2024 |